
# उपासनेमध्ये विश्वासणाऱ्यांना पवित्र शास्त्रानुसार शिक्षण द्या

मुलांना शिकवणाऱ्यांनी P7b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना** ''प्रिय प्रभू, येशू व त्याच्या शिष्यांनी शिकवले तसे शिकवण्यास आम्हांला साहाय्य कर.''

सध्याच्या गरजा व स्थानिक रिवाजांनुसार कार्यक्रम निवडा.

## 1. नव्या करारानुसार शिकवण्याची तयारी करा.



**पाहा इब्री 4:12 मध्ये** देव त्याच्या वचनाची तुलना तयारीशी कशी करतो.

**मत्तय 13** मधून शिक्षण देण्याची मार्गदर्शक तत्त्वे शिका.

**पाहा वचने 1-2 मध्ये** समजा येशू पुलपिटवर येऊ शिक्षण देऊ लागला तर.

*[उत्तर : येशू, नेहमीप्रमाणे बसला आणि शिकवू लागला. केव्हा केव्हा तो मचव्यात बसूनही शिकवत असे. वर्गात बसून नव्हे तर लोक असतील तिथे. जाऊन तो शिकवत असे. त्याच्या शिष्यांनी त्याच्याकडे आदर्श म्हणून पाहिले. आपल्या पाळकीय कौशल्यांचा त्याने कित्ता घालून दिला. हा कित्ता गिरवणे शिष्यांना सोपे गेले. उत्तम शिक्षक असेच करतात.]*

**पाहा वचने 3-9 व 34-45 मध्ये** येशूची लोकसमुदायाला शिक्षण देण्याची पध्दत.

*[उत्तर : येशूने देवाची सत्ये कथा वृत्तांतातून सांगितली. हे लोकांच्या सहजपणे लक्षात राहात असत आणि ते इतरांना सांगत. तसेच, येशूने लोकांना चर्चेत भाग धेव्यास सांगितले नाही. उत्तम शिक्षक नवीन विश्वासणाऱ्यांना त्यांची पूर्ण तयारी होईपर्यल बोलण्यास सांगत नाहीत.]*


**पाहा वचने 10-11 व 36 मध्ये** येशूची शिष्यांना शिक्षण देण्याची पध्दत.

*[उत्तर : येशूने त्याच्या शिष्यांचे प्रश्न-शंका ऐकून घेतल्या आणि त्यांच्याशी बातचीत केली. लोकसमुदायातील/लोकांची संख्या आणि आध्यात्मिक परिपक्वता यानुसार तो त्याच्या शिकवण्याच्या पद्धतीतही बदल करीत असे.]*



**टीप :** एकपात्री (सर्व काही एकटयानेच बोलायचे) भाषण करणे टाळा. नव्या पुढ्ढायांसह नव्या मंडळीसमोर शैलीपूर्ण भाषण पुलपीटवरुन करणे योग्य ठरणार नाही. सगळे बोलण्याचे काम त्यांनीच केले तर सैतान त्यांना अहंकाराच्या जाळयात ओढतो आणि मग ते विश्वासणाऱ्यांवर ओरडतात तसेच त्यांना नाउमेद करतात. आम्ही एकमेकांसाठी केल्या पाहिजेत अशा 39 कार्यकृती नव्या करारात आहेत. अनेक कार्यकृतींचा पुन्हा पुन्हा पुनरुच्चार केलेला आहे. यामध्ये एकमेकां बरोबर सहभागिता ठेवणे, तसेच क्षमा करणे, आपल्या चुका कबूल करणे, एकमेकांना सुधारुन बोध करणे या गोष्टींचा समावेश आहे. अशा प्रकारचा साद प्रतिसाद फक्त लहान गटांमध्येच मिळतो.

**पाहा वचने 12-17 मध्ये** वचन ऐकणाऱ्या सर्वांवर पवित्र आत्मा सारखाच प्रभाव टाकतो का.



**पाहा वचने 18–23 मध्ये** येशूने सांगितलेल्या शेतात पेरणी करणाया शेतकुयाच्या कथा–वृत्तांताचा अर्थ.

*[उत्तर : देवाच्या वचनाला आपल्या अंत:करणात दृढ मुळ धरु द्या आणि पवित्र आत्मा त्याला फळ देण्यास साहाय्य करील.]*

**पाहा वचने 24–30 व 37–43 मध्ये** सत्य–योग्य शिक्षण पारखून धेण्यासाठी आम्हांला आत्म्याकडून मिळणाया बोधाची गरज का आहे.

**पाहा वचने 31–33 मध्ये** थोडक्या शिक्षणातून मिळणारे मोठया प्रमाणातील फायदे.

**पाहा वचने 44–50 मध्ये** देवाच्या वचनाला नकार देण्याच्या तुलनेत ते स्वीकारल्याने होणारा अंतिम परिणाम.

**पाहा वचन 52 मध्ये** शिक्षकांनी विविध साधनांचा वापर केला तर.

*[उत्तर : येशूने शिकवण्यासाठी सर्वसामान्य शाळकरी प्रकारची विश्लेषण करणारी, ज्यात सिद्धांत तत्त्वांचे तपशील क्रमवार यादीने सादर केलेले असतात, अशी पद्धत वापरली नाही. येशूने जुन्या व नव्या करारातून, इतिहास व सध्याचे जीवन यातून गोष्टी एकत्र केल्या. देव आणि त्याची/सत्ये एकत्र करुन एका चित्ररुपात समोर मांडली तर आम्हांला ते अधिक चांगल्या प्रकारे समजते. देव अत्यंत क्रियाशील आहे, जीवन बदलून टाकणारा आहे आणि आमच्या अंत:करणांच्या अगदी नजीक आहे. त्याची गुणलक्षणे आणि कार्ये वेगवेगळी करुन दाखवता येत नाहीत इतका तो एकसंघ आहे. असे करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे चित्रातील रंगांचे रासायनिक विश्लेषण करुन त्याचे सौंदर्य वर्णन करण्यासारखे आहे.]*

पाहा वचने **51–52** मध्ये येशूने लोकं त्याची शिकवण आचरणात आणतील याची खात्री कशी करुन घेतली.

*[येशूने प्रश्न विचारले. ऐकणायांना व्यवस्थित समजले आहे की नाही याची खातरजमा करुन धेण्यासाठी तो व त्याचे शिष्य त्यांच्याशी बोलत असत. उत्तम शिक्षक शिकवलेल्या गोष्टींवर चर्चा करुन त्या आचरणात आणण्याची योजना आखण्यात विश्वासणायांना साहाय्य करतो.]*

पवित्र शास्त्रातील शास्त्रभागावर चर्चा करण्यासाठी लोकांना साहाय्य करा. त्यासाठी त्यांना चार **पवित्र शास्त्र चर्चा प्रश्न** विचारा :

1. शास्त्रभागतील कोणता भाग तुम्हांला आवडला?
2. शास्त्रभागाविषयी कोणते प्रश्न तुमच्या/मनात उभे राहिले?
3. यामध्ये कोणते अभिवचन किंवा आज्ञा तुम्हांला आढळाली?
4. हे आचरणात आणण्यासाठी आपण कोणती योजना केली पाहिजे?

शिकवण्याचा–शिक्षण देण्याचा हेतू, उद्देश **इफिस. 4:11–16** मधून लक्षात घ्या.

पाहा वचने **11–12** मध्ये उत्तम शिक्षणाचा परिणाम म्हणून मंडळीची सेवा कोणी केली पाहिजे.

पाहा वचने **13–16** मध्ये उत्तम शिक्षणामुळे निर्माण होणाया गोष्टी. तसेच, देव मंडळीरूपी शरीराकडून अपेक्षा करीत असलेल्या इतर कार्यक्रमांबरोबरच शिक्षण कसे देता येईल हेही पाहा.

## 2. तुमच्या सहकायांशी चर्चा करुन आठवडयातील कार्यक्रमांची आखणी करा.

नवीन शिक्षकांना प्रशिक्षण द्या. वर दिलेली मार्गदर्शकतत्त्वे त्यांना सांगा. उपासनेच्या वेळी आणि घरांमधील सभांमध्ये शिक्षण देण्याच्या कामात त्यांची ददत/ह्या.

नव्या मंडळयांमध्ये तुम्ही मार्गदर्शन करीत असलेल्या सेवकांना ही मार्गदर्शक तत्त्वे आचरणात आणण्यास मदत करा.

लोकांच्या घरोघर जाऊन भेटी ह्या. त्यांच्या गरजा व प्रश्न, समस्या समजून ह्या, म्हणजे तुम्हांला त्याबद्दल शिकवता येईल.

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करुन पुढील उपासनासभेत काय करायचे ते ठरवा.**

देवाचे वचन तयारीसारखे कसे आहे हे स्पष्ट करा (इब्री 4:12).

शिक्षण देण्याविषयीची मत्तय अध्याय 13 मध्ये तुम्हांला आढळलेली मार्गदर्शकतत्त्वे स्पष्ट करुन सांगा.

मत्तय 13 मधील एक अथवा काही दाखले, दृष्टांत सांगा किंवा ते अभिनयरुपाने दाखवा आणि मग लोकांना वर दिलेले चार प्रश्न विचारा, याचा उपयोग त्यांना पवित्र शास्त्रातील शास्त्रभागावर चर्चा करण्यासाठी होईल.

मुलांना, त्यांनी तयारी केलेले कार्यक्रम सादर करण्यास संधी द्या.

प्रभु **भोजन** घेण्यापूर्वी शलमोन राजा देवाच्या मंदिराचे समर्पण करतो हा शास्त्रभाग 1 राजे 8:10–13 मधून वाचा. आपण ख्रिस्ती लोक म्हणजे देवाचे मंदिर आहोत कारण त्याचा/पवित्र आत्मा आमच्या ठायी राहतो (1 करिंथ 3:16) हे स्पष्ट करुन सांगा.

काही लोकांनी आपआपल्या कुटुंबियांना किंवा इतर लोकांच्या घरांमध्ये देवाचे वचन शिकवले असेल तर देवाने त्यांची जीवने कशा प्रकारे बदलून टाकली हे त्यांना सांगण्यास सांगा.

**पाठ करा कलस्सै 3:16**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net